


दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com





वर्ष : ०५ | अंक : ३२६, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, मंगळवार, दि.०७ जुलै २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

# राज्यभरात पावसाने हाहाकार !

## मुंबईच्या मानखुर्दमध्ये हाहाकार, ६ जणांचा मृत्यू, तीन मजली बांधकाम कोसळल्याची घटना

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०६, मुंबई :** मानखुर्दमध्ये तीन मजली बांधकाम कोसळल्याची घटना घडली. या घटनेत आतापर्यंत ६ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर येत आहे. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. घटनास्थळी पोलीस, अग्निशामक दल आणि मुंबई महापालिकेचे कर्मचारी दाखल झाले आहेत. घटनास्थळी बचावकार्य सुरु आहे. जेसीबीच्या सहाय्याने मलबा दूर केला जात आहे. एनडीआरएफची टीम देखील घटनास्थळी दाखल झाली आहे. ढिगाऱ्याखाली अडकलेल्या नागरिकांना काढण्यासाठी रेस्क्यू ऑपरेशन केलं जात आहे. दुर्घटना मोठी असल्याने प्रशासनाचं मोठं पथक घटनास्थळी दाखल झाले आहे. स्थानिक नागरिकांच्या मदतीने ढिगाऱ्याखाली अडकलेल्यांना बाहेर काढलं जात आहे. जखमींना तातडीने रुग्णवाहिकेतून रुग्णालयात नेलं जात आहे.



मानखुर्दमध्ये जनता नगर परिसरात हनुमान मंदिराजवळ असणाऱ्या चाळ नंबर ५ मध्ये ही दुर्घटना घडली आहे. संबंधित घटना ही रविवारी (५ जुलै) रात्री साडेआठ वाजेच्या सुमारास घडली. घटनेनंतर परिसरात एकच गोंधळ उडाला. स्थानिक नागरिक यावेळी बचावासाठी धावले. पण ढिगाऱ्याखाली अडकलेल्यांना बाहेर काढणं हे सोपं नव्हतं. यामुळे तातडीने पोलिसांना या घटनेची माहिती देण्यात आली.

**गेल्या चार दिवसांत अनेक दुर्घटना...**

मुंबईत पाऊस सुरु झाल्यापासून सातत्याने दुर्घटना घडताना दिसत आहे. सर्वात आधी चेंबूरमध्ये शाळेच्या बसवर झाड कोसळल्याची घटना घडली. या दुर्घटनेत एका विद्यार्थ्याचा मृत्यू झाला तर काही विद्यार्थी जखमी झाले. यानंतर अंधेरीत मॅनहोलमध्ये पडून एका वृद्धाचा मृत्यू झाला. तर रविवारी कुर्ल्यात झाड कोसळल्याने एका वृद्धाचा मृत्यू झाला. तसेच गोरेगावमध्ये झाड कोसळल्याने दोन महिला जखमी झाल्या. या घटना ताज्या असतानाच मानखुर्दमध्ये तीन मजली बांधकाम कोसळल्याची घटना घडली आहे.

## महाराष्ट्रात पावसाने हाहा:कार; १३ जणांचा मृत्यू, तर १० जण जखमी

मुंबई, ठाणे, पुणे आणि नाशिकसह राज्यातील अनेक जिल्ह्यांना मागील दोन ते तीन दिवसांपासून मुसळधार पावसाने झोडपून काढलं असून काही ठिकाणी दुर्घटना घडल्या आहेत. राज्यभरात पावसामुळे विविध दुर्घटनांमध्ये आतापर्यंत एकूण १३ जणांना आपला जीव गमवावा लागला असून १० जण जखमी झाले आहेत. ५ जुलै रोजी मानखुर्द येथे झोपडपट्टीवर इमारत कोसळून ६ जणांनी आपला जीव गमावला, तर पालघरमध्ये पोहताना बुडून एक जण, मुंबई उपनगरात झाड कोसळून दोन जण, साताऱ्यात दरड कोसळून एक जण, सिंधुदुर्गात बुडून एक जण, पुण्यात दरड कोसळून एक जण, ठाण्यात पाण्यात बुडून एक जण तर घर कोसळून एक जण, रायगडमध्ये पाण्यात बुडून एक जण अशा एकूण १३ जणांचा मृत्यू झाला आहे.

पावसाचा परिणाम सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेवर झाला असून पुणे-मुंबई एक्सप्रेसवे व जुना महामार्ग, मिसिंग लिंक रस्ता, रेल्वे मार्गावरील दोन्ही बाजूंची वाहतूक थांबवली आहे. तर मावळ व ताम्हिणी घाटात पूरस्थिती असून पर्यायी मार्ग प्रभावित झाले आहेत. त्यामुळे नागरिकांनी अत्यावश्यक कारणाशिवाय प्रवास टाळावा, असं आवाहन करण्यात आलं आहे.

**आपत्कालीन परिस्थितीत हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन**

महाराष्ट्रात उद्भवलेल्या संभाव्य पूरपरिस्थिती आणि मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील जनतेला सतर्क राहण्याचं व प्रशासनाला सहकार्य करण्याचं आवाहन केलं आहे. राज्यात कोणत्याही प्रकारची आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्यास नागरिकांना तातडीने मदत मिळावी, यासाठी राज्य सरकारची संपूर्ण यंत्रणा सज्ज असून २४ तास कार्यरत असणारे नियंत्रण कक्ष सुरू करण्यात आले असून नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता केवळ अधिकृत सूत्रांकडून येणाऱ्या माहितीचा आधार घ्यावा आणि संकटसमयी जाहीर केलेल्या अधिकृत हेल्पलाईन क्रमांकांवर त्वरित संपर्क साधावा, असं मुख्यमंत्र्यांनी म्हटलं आहे.



**कोणत्या क्रमांकावर संपर्क साधता येणार?**


राज्यस्तरीय मुख्य नियंत्रण कक्षाशी संपर्क साधण्यासाठी १०७० हा टोल-फ्री क्रमांक कार्यान्वित करण्यात आला असून, नागरिक ०९३२१५८७१४३ या भ्रमणध्वनी क्रमांकावर किंवा ०२२-२२०२७९९० आणि ०२२-२२७९४२२९ या दूरध्वनी क्रमांकांवर देखील थेट संपर्क साधता येईल. याशिवाय, प्रत्येक जिल्ह्यामध्ये स्थानिक पातळीवर जलद गतीने मदत कार्य राबवण्यासाठी आणि परिस्थितीवर तात्काळ नियंत्रण मिळवण्यासाठी जिल्हास्तरीय नियंत्रण कक्षही सज्ज ठेवण्यात आले आहेत, ज्यांचा मुख्य संपर्क क्रमांक १०७७ असा आहे, असंही आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं आहे.

दरम्यान, कोणत्याही आपत्कालीन प्रसंगी नागरिकांनी अजिबात न घाबरता या जाहीर केलेल्या हेल्पलाईन क्रमांकांवर संपर्क साधून प्रशासकीय यंत्रणेची मदत घ्यावी, असं आवाहन मुख्यमंत्र्यांनी केलं आहे.

## नाशिकमध्ये ढगफुटी होण्याची शक्यता, त्र्यंबकेश्वर आणि सप्तशृंगी देवस्थान बंद

**दि.०६, नाशिक :** महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांमध्ये मुसळधार ते अतिमुसळधार स्वरुपाचा पाऊस पडत आहे. मुसळधार पावसामुळे अनेक ठिकाणी जनजीवन विस्कळीत झाले आहे. अनेक ठिकाणी दरड कोसळल्याच्या घटना देखील घडल्या आहेत. तसेच अनेक ठिकाणी पुराचे पाणी गावात शिरल्याच्या देखील घटना घडल्या आहेत. राज्यभरात सुरु असलेल्या पावसाचा प्रकोप हा ८ जुलैपर्यंत राहणार असल्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. हवामान विभागाने नाशिक जिल्ह्याला उद्या पावसाचा रेड अलर्ट जारी केला आहे. विशेष म्हणजे नाशिक, त्र्यंबकेश्वर आणि इगतपुरी या तीन तालुक्यांमध्ये ढगफुटीसदृश्य पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. संभाव्य धोका लक्षात घेता मुख्यमंत्र्यांनी महत्त्वाची बैठक घेतली आहे. यानंतर नाशिकचे जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी तातडीची पत्रकार परिषद घेतली.

जिल्हाधिकारी काय म्हणाले?



नाशिक त्र्यंबकेश्वर परिसरात अतिमुसळधार पाऊस पडणार असल्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. त्र्यंबकेश्वर, इगतपुरी आणि नाशिक या तीन तालुक्यात जास्त पावसाची शक्यता आहे. पेठ, दिंडोरी, कळवण, सटाणा, बागलाण या तालुक्यांमध्येही मोठ्या प्रमाणात पाऊस पडणार आहे. पण कमी वेळात अतिमुसळधार पाऊस, ज्याला आपण ढगफुटी म्हणतो तसा पाऊस त्र्यंबकेश्वर, नाशिक आणि इगतपुरी परिसरात पडण्याची शक्यता आहे. नाशिक शहराच्या पश्चिम भागात जास्त पावसाची शक्यता आहे. हवामान विभागाकडून हवामान इशारा मिळेल तसा आपल्याला नेमका कुठे जास्त पाऊस पडणार याची माहिती अधिक स्पष्टपणे मिळेल, असं जिल्हाधिकारी आयुष प्रसाद म्हणाले.

**सर्व शाळा, महाविद्यालयांना सुट्टी जाहीर, शेतकऱ्यांना घरी राहण्याचं आवाहन**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज सकाळी बैठक घेतली. मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या निर्देशांनुसार सर्व गोष्टींचं नियोजन केलं जात आहे. नाशिक महापालिका आयुक्त आणि महापौर शहर भागातील पूर परिस्थितीवर नियोजन करणार आहे. तर ग्रामीण भागात नाशिक तालुका, त्र्यंबकेश्वर आणि इगतपुरी तालुका या भागातील सर्व शाळा, कॉलेज उद्या बंद राहणार आहे. उद्या मुसळधार पावसाचा अंदाज असल्याने शेतकऱ्यांनी शेतात जाणं टाळावं. अतिआवश्यक नसेल तर प्रवास करणं टाळावं, असं आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केलं आहे.

काही रस्ते बंद राहणार

ज्या भागांमध्ये दरड कोसळण्याची शक्यता आहे ते रस्ते बंद केले जाणार आहेत. त्याची यादी झथ्, राष्ट्रीय महामार्ग आणि पोलीस विभाग यांच्याकडून जारी केली जाईल. शेतकऱ्यांना विनंती आहे की, कारण नसताना घराबाहेर पडू नये, असं आवाहनदेखील जिल्हाधिकाऱ्यांनी केलं आहे.

**त्र्यंबकेश्वर आणि सप्तशृंगी देवस्थान बंद राहणार**

उद्या त्र्यंबकेश्वर देवस्थान बंद ठेवण्यात येणार आहे. आज संध्याकाळी सूर्यास्त झाल्यानंतर शेवटची पूजा राहणार आहे. त्यानंतर त्र्यंबकेश्वर देवस्थान परवापर्यंत बंद राहणार आहे. भाविकांनी उद्या त्र्यंबकेश्वरला येणं टाळावं. तसेच सप्तशृंगी मंदिराच्या परिसरात ६५ मिमी पेक्षा जास्त पावसाची शक्यता आहे. त्यामुळे सुरक्षेच्या कारणास्तव सप्तरशृंगी देवस्थान उद्या बंद ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत, अशी माहिती जिल्हाधिकाऱ्यांनी दिली.

## आळंदीत इंद्रायणी नदीने धारण केले रौद्ररूप



**अक्षराज : विनोद गोरे**

**दि.०६, आळंदी (पुणे) :** श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी प्रस्थान सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर मागील काही दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे आळंदीत इंद्रायणी नदीला महापूर आल्याने इंद्रायणी नदीवरील चारही पूल पूर्णतः बंद करण्यात आले. चारही पुलांवरून आवाक्या बाहेर पाणी वाहत असल्याच्या कारणामुळे आळंदी शहराचा संपर्क पूर्णतः तुटला.

प्रसंगी इंद्रायणीकडे आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवरश्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी प्रस्थान सोहळ्याच्या निमित्ताने राज्यभरातून येणाऱ्या दिंड्या आज पुणे शहरातच प्रशासनाने मुक्कामी ठेवल्या आहेत. तसेच आळंदी शहराकडे कोणत्याही वारकऱ्यांनी येऊ नये असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. जे वारकरी बांधव आळंदी मध्ये दाखल झाले होते. त्यांना आळंदी नगरपरिषद प्रशासन, आळंदी पोलीस स्टेशन प्रशासन, तसेच अग्निशमन दल पीएमआरडीए यांच्याकडून आवश्यक तिथे बचाव कार्य करण्यात आले. इंद्रायणीने आळंदीत विळखा घातल्याने जवळपास ४०० नागरिकांची पुराच्या पाण्यातून सुटका करण्यात आली.

इंद्रायणी नदीचे हे रौद्ररूप पाहण्यासाठी बाहेरून दाखल झालेले भाविक आणि आळंदी, चऱ्होली तसेच पंचक्रोशीतील नागरिकांनी एकच गर्दी केली होती.

## अहिल्यानगर शहरासह जिल्ह्यात पावसाची सर्वदूर हजेरी

### शेतकऱ्यांना दिलासा, पेरण्यांना येणार वेग

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०६, अहिल्यानगर :** अहिल्यानगर शहरासह जिल्ह्याच्या विविध भागांत गेल्या दोन दिवसांपासून पावसाने हजेरी लावल्याने शेतकरी वर्गाला मोठा दिलासा मिळाला आहे. जून महिन्यात पावसाने अपेक्षित हजेरी लावली नसल्यामुळे खरीप हंगामातील पेरण्या मोठ्या प्रमाणात खोळंबल्या होत्या. त्यामुळे शेतकरी चिंतेत होता. मात्र, आता सर्वदूर झालेल्या पावसामुळे शेतकऱ्यांमध्ये नव्याने आशेचे वातावरण निर्माण झाले आहे.

**खरीप पिकांच्या पेरण्यांना वेग !**

गेल्या महिनाभरापासून पावसाअभावी अनेक शेतकऱ्यांनी पेरण्या पुढे ढकलल्या होत्या. काही ठिकाणी पेरणी केलेल्या पिकांनाही ओलाव्याअभावी फटका बसण्याची भीती व्यक्त केली जात होती. मात्र, गेल्या दोन दिवसांत झालेल्या समाधानकारक पावसामुळे जमिनीत पुरेसा ओलावा निर्माण झाला असून खरीप पिकांच्या पेरण्यांना आता वेग येण्याची शक्यता आहे.

जिल्ह्यातील अनेक भागांत मध्यम स्वरूपाचा तर काही ठिकाणी चांगला पाऊस झाल्याने शेततळी, ओढे आणि लहान नाल्यांमध्ये पाण्याची आवक सुरू झाली आहे. पावसामुळे वातावरणातही गारवा निर्माण झाला असून नागरिकांना उकाड्यापासून दिलासा मिळाला आहे.

दरम्यान, कृषी क्षेत्राशी संबंधित तज्ज्ञांनी शेतकऱ्यांना हवामानाचा अंदाज लक्षात घेऊन नियोजनबद्ध पेरणी करण्याचा सल्ला दिला आहे. पुढील काही दिवसही पावसाचा जोर कायम राहिल्यास खरीप हंगामाला मोठा दिलासा मिळणार असून उत्पादनवाढीसाठी ही परिस्थिती पोषक ठरणार आहे. तसेच मोठ्या पावसाची प्रतीक्षा अद्याप शेतकऱ्यांना आहे.

## भंडारदरा पाणलोट क्षेत्रात पावसाचा कहर !



उत्तर नगर जिल्ह्यासाठी वरदान ठरलेल्या भंडारदरा धरणाच्या पाणलोटात पावसाने तांडव घातले आहे. जिल्ह्याची चेरापुंजी म्हणून प्रसिद्ध असणाऱ्या घाटघर येथे तब्बल सहा इंच पावसाची नोंद झाली असून संपूर्ण घाटघर गाव धुक्यामध्ये हरवले आहे. भंडारदरा धरणाचा पाणीसाठा ३८९९ दशलक्ष घनफुटावर पोहचल्याने भंडारदरा धरण ३५.३२ टक्के भरले आहे. निळवंडे धरणाचा पाणी साठा १६०७ दशलक्ष असून १९.१८ टक्के भरले आहे. अकोले तालुक्यातील भंडारदरा धरणाच्या पाणलोटात व परीसरात गत तीन दिवसांपासून मुसळधार पावसाचे तांडव सुरू आहे. सतत पडत असलेल्या पावसाने आदिवासी बांधवांचे जनजिवन विस्कळीत झाले आहे. आदिवासी बांधवांवर आपली पाळीव जनावरे घरातच बांधण्याची वेळ आली आहे. पावसामुळे हवेत गारठा तयार झाला असुन घराघरांमध्ये शेकोट्या पेटल्या आहेत. मुसळधार पाऊस पडत असल्यामुळे काळ्या कातळावरुन पांढऱ्या शुभ्र पाण्याचे धबधबे कोसळत असून ओढे-नाले दुथडी भरून वाहते झाल्याने भंडारदरा धरणाच्या पाणीसाठ्यात झपाट्याने वाढ होण्यास सुरुवात झाली आहे. भंडारदरा परीसरात यावषचा सर्वात जास्त पावसाची नोंद घाटघर येथे झाली.

**घाटघरला सहा इंच पाऊस :** गत २४ तासांत भंडारदरा येथे ७२ मिमी, घाटघर येथे १४० मिमी, पांजरे ८६ मिमी, रतनवाडी येथे ११३ मिमी, वाकी ६६ मिमी पाऊस नोंदविला गेला. कळसुबाई शिखरावर पाऊस कोसळत असल्याने कृष्णावंती नदीत पाणी वाढत असल्याने वाकी तलावातही पाण्याची आवक सुरू आहे.

अक्षराज






## अभिनयातील भीष्माचार्य

ट्रॅजीडी किंग म्हणून ओळखले जाणारे हिंदी चित्रपट सृष्टीतील भीष्माचार्य दिलीपकुमार यांचा आज पाचवा स्मृतिदिन. पाच वर्षापूर्वी आजच्याच दिवशी म्हणजे ७ जुलै २०२१ रोजी दिलीपकुमार यांचे वृद्धपकाळाने वयाच्या ९८ व्या वर्षी दुःखद निधन झाले. दिलीपकुमार यांच्या निधनाने चित्रपट सृष्टीतच नव्हे तर संपूर्ण देशात शोककळा पसरली होती. दिलीपकुमार यांच्या निधनाने अभिनयाचे चालते बोलते विद्यापीठच हरपले असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. दिलीपकुमार यांचा जन्म ११ डिसेंबर १९२२ रोजी पेशावर येथे झाला. त्यांचे मूळ नाव मोहम्मद युसूफ खान असे होते. पेशावरहून त्यांचे कुटुंब उदरनिर्वाहासाठी मुंबईत आले. दिलीपकुमार यांच्यासह बारा भावंडे होते. त्यांच्या कुटुंबात पाहुण्यांचाही राबता होता त्यामुळे आपणही काही तरी काम करून घर खर्चास मदत करावी असा विचार करून दिलीपकुमार पुण्याला आले. तिथे त्यांनी लष्करी कॅंटीनमध्ये मॅनेजरचा सहाय्यक म्हणून काम केले. दुसऱ्या महायुद्धात लष्करी कॅंटीनचे व्यवस्थापन बदलले आणि दिलीपकुमार जमा केलेले पाच हजार रुपये घेऊन घरी परत आले. मुंबईला आल्यावर त्यांना पुन्हा नोकरी शोधावी लागली. दिलीपकुमार हे नोकरीच्या शोधात आहे हे त्यांचे परिचित डॉ मसानी यांना समजले तेंव्हा डॉ मसानी यांनी त्यांना माहीम येथील बॉम्बे टॉकीजच्या स्टुडिओमध्ये देविका राणी यांच्याकडे घेऊन गेले. देविका राणी यांनी दिलीपकुमार यांचे राजबिंडे व्यक्तिमत्त्व आणि उर्दूवरील पकड पाहून त्यांना महिना बाराशे रुपये पगारावर अभिनय करण्याची ऑफर दिली. वास्तविक हा प्रस्ताव दिलीपकुमार यांना मान्य नव्हता कारण चित्रपटात अभिनय करावा असा विचार त्यांनी कधीही केला नव्हता पण महिना बाराशे रुपये मिळतात ही रक्कम त्याकाळी खूप मोठी होती त्यामुळे त्यांनी हा प्रस्ताव स्वीकारला आणि देशाला एक महान अभिनय सम्राट मिळाला. देविका राणी यांनीच त्यांना दिलीपकुमार हे नाव दिले. १९४४ साली आलेल्या ज्वार भाटा या चित्रपटाद्वारे दिलीपकुमार यांनी आपल्या चित्रपट कारकिर्दीला सुरवात केली. १९४४ ते १९९८ पर्यंत म्हणजे सहा दशकापेक्षा अधिक काळ दिलीपकुमार यांनी आपल्या अभिनयाने गाजवून सोडला. या दरम्यान त्यांचे अनेक चित्रपट सुपरहिट झाले. यात त्यांनी वेगवेगळ्या प्रकारच्या भूमिका केल्या. अंदाज, राम और श्याम, आन, देवदास, आझाद, मुगल - ए - आझम, गंगा जमुना, नया दौर हे त्यांचे चित्रपट तर सुपरहिट झाले. या चित्रपटांनी तरुणाईला वेड लावले. १९५७ साली आलेल्या गंगा जमुना या चित्रपटातील मांग के साथ तुम्हारा...मैने मांग लिया संसार....या गाण्याने तरुणाईला वेड लावले होते. या चित्रपटात वैजयंती माला या त्यांच्या नायिका होत्या. चित्रपट रसिक त्यांच्या अभिनयाने इतके भारावले होते की त्याकाळच्या तरुणांचे ते आयडॉल बनले. देवदास या चित्रपटातील त्यांची भूमिका ही तर त्यांच्या कारकिर्दीतील मैलाचा दगड ठरली. त्यांच्या या चित्रपटातील भूमिकेचे नंतर अनेक अभिनेत्यांनी अनुकरण केले पण कोणालाही त्यांच्या अभिनयाच्या जवळपास पोहचता आले नाही. १९७६ साली आलेला बैराग हा चित्रपट त्यांचा नायक म्हणून शेवटचा चित्रपट ठरला या चित्रपटात त्यांनी तिहेरी भूमिका साकारली. त्यानंतर काहीकाळ ब्रेक घेऊन त्यांनी मनोज कुमार यांच्या क्रांती या चित्रपटापासून चरित्र अभिनेता म्हणून काम करण्यास सुरुवात केली. शक्ती, विधाता, मजदूर, दुनिया, मशाल, कर्मा या चित्रपटात त्यांनी चरित्र भूमिका केल्या. सुभाष घई यांच्या सौदागर या चित्रपटात राजकुमार यांच्यासोबत त्यांची जुगलबंदी चांगलीच गाजली. १९९८ साली आलेला किला हा त्यांनी अभिनय केलेला शेवटचा चित्रपट ठरला. या दरम्यान त्यांना अनेक पुरस्कारही मिळाले. सर्वोत्कृष्ट अभिनयासाठी दिलीपकुमार यांना आठ पुरस्कार मिळाले. भारत सरकारनेही त्यांच्या अभिनय कारकिर्दीची योग्य दखल घेऊन पद्मभूषण, पद्मविभूषण या मानाच्या पुरस्काराने त्यांना गौरवले. हिंदी चित्रपट सृष्टीतील सर्वोच्च असा दादासाहेब फाळके पुरस्कारानेही त्यांना गौरविण्यात आले. पाकिस्ताननेही त्यांना निशान - ए - इम्तियाज या त्यांच्या सर्वोच्च पुरस्काराने गौरवले आहे. दिलीपकुमार हे अभिनयातील भीष्माचार्यच होते. त्यांचा सारखा अभिनेता पुन्हा होणार नाही. अभिनय सम्राट दिलीपकुमार यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

**- श्याम बसप्पा ठाणेदार**

# 'कारभारी' आणि 'कारभार'






**अनंत बोरसे**
**शहापूर जिल्हा ठाणे**
**मोबा. ९१५८४९५०३७**

गेल्या काही दिवसांपासून मुंबई आणि राज्यात पावसाचे आगमन झाले आणि त्याच बरोबर नागरिकांचा संकटकाल सुरू झाला आहे. चेंबुर येथे झाड पडुन एका बालकाचा मृत्यू झाला तर कुर्ला येथे एका दुकानावर झाड पडल्याने एकाचा मृत्यू झाला. उघड्या मॅनहोल मधे पडुन देखील काही जणांना आपला जीव गमवावा लागला. तर मानखुर्द मधे एक इमारत दुर्घटना घडुन त्यात सहा जणांचा मृत्यू झाला. अशाच घटना ठाणे, पुणे शहरात घडत आहेत. मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी आहे तसेच आंतरराष्ट्रीय दर्जाचे शहर.

मुंबईचा वार्षिक अर्थ संकल्प हा ७० ते ८० हजार कोटी रुपयांचा. देशातील अनेक लहान राज्यांपेक्षा बीएमसी चे वार्षिक बजेट आहे. दरवर्षी पावसाळ्यापूर्वीच्या कामांसाठी करोडो रुपये खर्च केले जातात मात्र तरीही मुंबईची तुंबापुरी होण्यापलीकडे काही होत नाही. बीएमसी चे कारभारी होण्यासाठी ऐन केन प्रकाराने प्रयत्न केले जातात कारण बीएमसी च्या सत्ताकारणावरच अनेकांचे राजकारण, अर्थकारण अवलंबून असते, मुंबई ही जणु सोन्याचे अंडे देणारी कोंबडी आहे.आता जरी एकमेकांविरूद्ध आरोप प्रत्यारोप होत असले तरी मधली काही वर्षांची प्रशासकीय राजवट वगळता मुंबई महापालिकेवर भाजप शिवसेना यांचीच सत्ता होती आणि दोघेही आपण सगळे भाऊ भाऊ मिळून सारे लुटून खाऊ अशा पद्धतीने गुण्यागोविंदाने कारभार करत होते. प्रशासक जरी होते तरी ते मंत्रालय धार्जिणी भुमिका घेऊन काम करत होते हे ऊघड सत्य आहे. जिथे सत्ताकारण, अर्थकारण येते तिथे पक्षापलिकडे जाऊन हातात हात घालून काम करतात मध्यंतरी निधी वाटपावरून झालेला कलगीतुरा चांगलाच रंगला होता. निधी वाटपात दुजाभाव होतो हे अनेकदा अधोरेखित झाले आहे म्हणूनच विरोधी पक्षात रहाण्याची कोणाचीच तयारी नाही.

या वर्षी जानेवारी मधे झालेल्या निवडणुकीत बीएमसी चे कारभारी बदलले, वाटले होते कारभार पण बदलेल मात्र कारभारात काहीच बदल झाला नाही, याऊलट भ्रष्टाचार वाढल्याची चर्चा आहे. जवळपास तीस वर्षांनंतर बीएमसी मधे भाजपचा महापौर बसला तर ऊपमहापौर शिवसेनेला मिळाले. पण पावसाळापुर्व कामांच्या निमित्ताने पहाणी दौऱ्याच्या निमित्ताने महापौर - ऊपमहापौरांमधील कलगीतुरा मुंबईकरांना पहायला मिळाला. मुंबईतील ऊघड्या मॉनहोल बाबत न्यायालयाची दिशाभूल केली जात आहे.

गेल्या काही वर्षांपासून बेसुमार पद्धतीने मोठ्याप्रमाणावर नागरिकिकरण आणि शहरीकरणामुळे नागरी सुविधा अपुऱ्या पडत आहेत त्यातच शहर नियोजनाकडे तर अक्षम्य दुर्लक्ष होत आहे, केवळ सिमेंटची जंगले ऊभारली जात आहे. पाण्याचा निचरा होण्यासाठी मोठे पंप लावले जात आहेत त्यावर लाखो रुपये खर्च केले जातात मात्र तरीही पाणी साचते आहे.मुंबई चे शांघाय करण्याचे स्वप्न अनेकदा दाखवले गेले मात्र शांघाय होईल तेव्हा होईल किमान दरवर्षी मुंबईची तुंबापुरी तरी होऊ नये यासाठी गांभीर्याने ऊपाययोजना होणे गरजेचे आहे.कारभारी पहारेकरी झाले पहारेकरी कारभारी झाले तरी मुंबईची परिस्थिती काही केल्या बदलत नाही हेच पावसाच्या निमित्ताने अधोरेखित झाले. पालिका प्रशासन आणि लोकप्रतिनिधीं हे एकमेकांवर जबाबदारी ढकलत आहेत. विरोधकांनी प्रश्न विचारले कि तुमच्या पंचवीस वर्षाचा हिशेब काढु का? असा प्रतिप्रश्न केला जातो.


राजकारण, सत्ताकारण करतांना कोणी आम्ही कारभारी, तर कोणी आम्ही पहारेकरी असल्याचे दावे करतो तर कोणी स्वतःला चौकीदार म्हणवुन घेतो मात्र सगळेच सोयीनुसार भुमिका बदलतात, आता बीएमसी मधे पहारेकरी कारभारी झाले आणि कारभारी पहारेकरी झाले तरी मुंबईची परिस्थिती काही केल्या बदलत नाही हेच पावसाच्या निमित्ताने अधोरेखित झाले. भ्रष्टाचाराने सर्वच व्यवस्था बरबटलेल्या आहेत आणि त्या सुधाराव्या अशी कोणाची ना इच्छाशक्ती ना मानसिकता. २०१४ मधे देशात सत्तांतर झाले तेंव्हा जनतेच्या अपेक्षा उंचावल्या होत्या, भ्रष्टाचार मुक्त भारत करणार, पारदर्शक कारभार करणार, ना खाऊंगा ना खाने दुंगा असे सांगितले गेले. मात्र ना भ्रष्टाचार मुक्त भारत झाला, ना कुठे कारभारात पारदर्शकता दिसते ना ना खाऊंगा ना खाने दुंगा च्या ऐवजी तुम भी खाओ, हम भी खाते अशा पद्धतीने भ्रष्टाचाऱ्यांना आपल्याकडे घेऊन सत्तापदे दिली जात आहेत. करोडो राम भक्तांची श्रद्धा असलेल्या अयोध्येतील श्रीरामाच्या दानात चोरी होणे यापेक्षा मोठे पाप असु शकत नाही. शेवटी काय तर कारभारी, पहारेकरी, चौकीदार हे सगळे एकाच माळेचे मणी.

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

# रडणारी इंद्रायणी... विठुरायाचे अश्रू आणि निसर्गाचा आक्रोश

आषाढी वारी...लाखो वारकऱ्यांच्या भक्तीने भारावलेला तो सोहळा. ज्ञानोबा-तुकारामच्या जयघोषाने दुमदुमणारी पंढरीची वाट, टाळ-मृदुंगाच्या निनादात हरवलेली माणसे आणि विठुरायाच्या भेटीची आस... हे दृश्य दरवर्षी मनाला आनंद देणारे असते.

पण यावर्षी मुसळधार पाऊस, इंद्रायणी नदीला आलेला पूर आणि निर्माण झालेली गंभीर परिस्थिती पाहताना मन सुन्न होते. असे वाटते, जणू इंद्रायणी माय आज दुःखाने रडत आहे. तिच्या प्रत्येक उसळणाऱ्या लाटेत एक हंबरडा दडलेला आहे आणि ती माणसाला विचारत आहेमाझी ही अवस्था करण्याचा अधिकार तुम्हाला कोणी दिला?



आज कोसळणारा पाऊस केवळ पावसाचा वर्षाव वाटत नाही; तो निसर्गाच्या अश्रूंचा वर्षाव वाटतो. कदाचित माणसाच्या स्वार्थाने, अहंकाराने आणि निसर्गावर चालवलेल्या अत्याचारांनी तोही व्यथित झाला आहे.

कुठे झाडांची सर्रास कत्तल, कुठे नद्यांमध्ये टाकला जाणारा कचरा, कुठे डोंगरांचे विद्रूपीकरण, तर कुठे निसर्गाचा होत असलेला अवमान... हीच का आपल्या प्रगतीची व्याख्या? परमेश्वराने आपल्याला ज्या सुंदर सृष्टीची देणगी दिली, तिचे रक्षण करण्याऐवजी आपण तिचाच विनाश करत आहोत.

म्हणतात, अति तिथे माती. निसर्ग खूप सहन करतो, पण जेव्हा त्याचा संयम संपतो तेव्हा तो आपल्या रौद्र रूपाची जाणीव करून देतो. दुर्दैव इतकेच की, त्याचा फटका फक्त दोषींनाच नाही तर निष्पाप बालकांना, सामान्य नागरिकांना आणि निसर्ग जपणाऱ्या लोकांनाही बसतो.

आज समाजातही अनेक वेदनादायी घटना घडत आहेत. लहान मुलींवरील अत्याचार, वाढती हिंसा, स्वार्थ, असंवेदनशीलता आणि माणुसकीचा होत चाललेला ऱ्हास... हे सर्व पाहून विठुरायालाही वेदना होत असतील. कदाचित तोही म्हणत असेल, मी अशी माणसे घडवली नव्हती. माझी माऊली तर प्रेम, करुणा, समता आणि सेवेचा संदेश देणारी होती.

खरी माऊली प्रत्येक स्त्रीमध्ये आई, बहीण, मुलगी आणि देवीचे रूप पाहते. ती माणसाला माणूस म्हणून जगायला शिकवते. मग आपण त्या शिकवणीपासून इतके दूर का जात आहोत?

आज गरज आहे ती सरकारकडे किंवा इतरांकडे बोट दाखवण्याची नाही, तर स्वतःपासून बदल घडवण्याची. प्रत्येकाने एक झाड लावले, नद्या-नाले स्वच्छ ठेवले, प्लास्टिकचा वापर कमी केला, पाण्याची बचत केली आणि माणुसकीची नाती जपली, तर निसर्ग पुन्हा हसताना दिसेल.

इंद्रायणीचा हा आक्रोश, पावसाच्या या धारा आणि निसर्गाचा हा इशारा आपण वेळेत समजून घेतला, तरच भविष्यातील पिढ्यांना सुंदर, हिरवीगार आणि सुरक्षित पृथ्वी देऊ शकू.

चला, आज एक संकल्प करूया...

झाडे लावूया... नद्या वाचवूया... स्त्रीचा सन्मान करूया... माणुसकी जपूया... आणि निसर्गाशी मैत्री करूया.

कारण विठुरायाला केवळ टाळ-मृदुंगाचा गजर नको आहे; त्याला आपल्या आचरणातील भक्ती हवी आहे. ज्या दिवशी आपण निसर्ग, माणुसकी आणि संस्कृती यांचे रक्षण करू, त्या दिवशीच खरी वारी पूर्ण होईल आणि इंद्रायणी मायही आनंदाने वाहू लागेल.

**- कल्याणी पवार**
**इंदौर**

## धुडगूस

मुसळ धार पाऊस
घालू लागी धुडगूस
सूर्य गेला ढगाआड
उन्हाची रे धुसफूस

घामळल्या शरीरास
पुरे ओलीचिंब हौस
पाण्यां खाली गुडूप
रस्त्यां नसे मागमूस

हेंदाळणा-याढगाला
कुणीतरी लावे फूस
नो एन्ट्री कुठेच नसे
रे वाट्टेलं तिकडे घूस

छत्र्या अन् रेनकोट
चालू केवढा जुलूस
आईदाटते बाळाला
उगाचं नको भिजूस

अंदाज चुके पावसा
वावरा पेरणी उरूस
विनंती कळकळची
नको उगा बा रुसूस

झाडे भिंती घरे पडे
खूप जागी नासधूस
नुकसान कुठे किती
कराजरा विचारपूस

**हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक वृत्त अचूक बातमी

# पावसाळी सहलीतील बेफिकीरी तरुणाईच्या मुळावर...

यंदा पावसाळा सुरु होण्यास लेट झाला असला तरी थेट बरसत असल्याने ओढे - नाले, नदी तुडूंब भरुन वाहू लागले असून धबधबे प्रवाहित झाल्याने वर्षासहली ते दुर्गभटकंतीपर्यंत अनेक बेत रचले जात आहेत. यामध्ये प्रामुख्याने तरुणाईचा सहभाग मोठा असतो सद्या सहलीपेक्षा मद्यप्राशन करुन धिंगाणा, नको ती गाणी लावून हुल्लडबाजी करण्याचे प्रकार वाढीस लागले आहेत अतिउत्साही युवकांचा अतिधाडशीपणा जिवावर बेतला जातो याचीच प्रचिती यंदाच्या विविध ठिकाणी घडलेल्या घटनांवरुन अधोरेखित झाले आहे अनेक ठिकाणी पाण्यात बुडून मृत्यू झाल्याचे समोर आले आहे. जीव धोक्यात घालून मोबाईलवर सेल्फी घेणे, व्हिडिओ, रिल्स बनविणे यासारखे प्रकार म्हणजे तरुणाईची बेफिकिरीचं म्हणावी लागेल पावसामुळे डोंगर हिरवेगार झालेले असतात, डोंगरावरून धबधबे वाहात असतात, वेगवेगळ्या प्रकारच्या फुलांनी झाडे नटलेली असतात. सर्वत्र वातावरण आल्हाददायक असते.अतिआत्मविश्वास किंवा



परिसराचे नसलेले भौगोलिक ज्ञान ह्या गोष्टींमुळेसुद्धा अपघात होतात पावसाळ्यात कुठल्याही सहलीला किंवा ट्रेकला जाताना त्या ठिकाणाची, तेथे जाणाऱ्या विविध वाटांची पूर्ण माहिती करून घेणे. जर त्या ठिकाणी पहिल्यांदाच जाणार असाल आणि धुवांधार पाऊस पडत असेल, तर गावातून एखादा मार्गदर्शक घेणे कधीही चांगले.

परंतु, बऱ्याचवेळा एखाद्या ठिकाणाची माहिती मित्रांकडून किंवा नेट वरून घेतलेली असते. त्या ऐकीव माहितीच्या आधारे पर्यटक त्या ठिकाणी जाण्याचा प्रयत्न करतात, पण त्या ठिकाणी स्वतः आधी भेट दिलेली नसल्यामुळे अनेकवेळा पर्यटक वाट चुकतात, क्वचित प्रसंगी आपला जिवाला मूखावे लागते बऱ्याचदा होणारे अपघात त्या ठिकाणी असलेल्या सूचनांचे पालन न केल्यामुळे आणि गावकऱ्यांनी दिलेल्या धोक्याच्या इशाऱ्यांकडे दुर्लक्ष केल्यामुळे होतात.पावसात भटकंती केली पाहिजे मात्र भटकंती करत असताना स्वतःची आणि इतरांची पण काळजी घेणे गरजेचे आहे. भटकंती करताना संयम असायला हवा तसेच मला काही सर्व माहिती आहे हा अतिआत्म उत्साह दाखवू नका, विशेषतः पाण्याच्या ठिकाणी. निसर्गाचा योग्य तो मान राखणे महत्वाचे आहे भटकंतीची आठवण आपल्या मनात कायमची कोरुन ठेवायची कि आपल्या छोट्याश्या चुकीने आपण दुसऱ्यांच्या मनात कायम घर करुन राहायचे ? याचा विचार तरुणाईने करणे गरजेचे आहे !

**- राजू जाधव,**
**मांगूर जि.बेळगांव**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## महाबळेश्वरात पावसाचा जोर कायम !



**अक्षराज : रियाज मुजावर**

**दि.०६, महाबळेश्वर :** जागतिक दर्जाचे पर्यटनस्थळ आणि पावसाचे माहेरघर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या महाबळेश्वरमध्ये गेल्या काही दिवसांपासून पावसाने जोरदार हजेरी लावली आहे. एका दिवसात तब्बल २० इंच पावसाची नोंद झाली असून, कालपर्यंत एकूण ६८ इंच पाऊस झाल्याची नोंद करण्यात आली आहे. त्यामुळे संपूर्ण परिसर जलमय झाला असून सर्वत्र दाट धुक्याची चादर पसरली आहे.

सततच्या मुसळधार पावसामुळे वेण्णा तलाव दुथडी भरून वाहत असून, परिसरातील निसर्ग अधिकच खुलून दिसत आहे. धुक्याने वेढलेले डोंगर, हिरवाईने नटलेला परिसर आणि कोसळणारा पाऊस याचा आनंद घेण्यासाठी मोठ्या संख्येने पर्यटक महाबळेश्वरमध्ये दाखल होत आहेत. पावसात भिजत आणि रम्य निसर्गाचा मनमुराद आनंद लुटताना पर्यटकांचे चित्र सर्वत्र पाहायला मिळत आहे.

यंदा उशिरा सुरू झालेल्या पावसाने आता वेग घेतला असून, मागील वर्षीच्या पावसाच्या विक्रमाच्या जवळपास मजल मारली आहे. वाढत्या पावसाच्या पार्श्वभूमीवर महाबळेश्वर नगरपरिषदेकडून आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

नगराध्यक्ष सुनिल शिंदे व त्याचे सहकारी नगरसेवक तसेच मुख्याधिकरी योगेश पाटील यांनी संबंधित अधिकाऱ्यांना सतर्क राहून परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवण्याचे तसेच नागरिक आणि पर्यटकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक ती खबरदारी घेण्याचे निर्देश दिले आहेत.

## वेण्णा माईची ओटी भरून वेण्णा तलावाचे जलपूजन



**अक्षराज : रियाज मुजावर**

**दि.०६, महाबळेश्वर :** महाबळेश्वरमध्ये सलग झालेल्या मुसळधार पावसामुळे वेण्णा तलाव तुडुंब भरून वाहू लागल्याने शहरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर महाबळेश्वर नगरपालिकेच्या वतीने पारंपरिक श्रद्धेनुसार वेण्णा माईची ओटी भरून जलपूजन करण्यात आले. यावेळी वेण्णा माईला साडी, खण, नारळ, फुले तसेच हळद-कुंकू अर्पण करून परिसराच्या सुख-समृद्धीसाठी, भरभराटीसाठी आणि सर्व नागरिकांच्या मंगलमय आयुष्यासाठी प्रार्थना करण्यात आली.

या प्रसंगी नगराध्यक्ष सुनील शिंदे, माजी उपनगराध्यक्ष अफजलभाई सुतार, नगरसेवक ॲड. संजय जंगम, रोहित ढेबे, आबा शिंदे, रविंद्र कुंभारदरे, ज्येष्ठ नगरसेविका विमलताई पार्टे, विद्या बावळेकर, संगीता वाडकर, मुख्य लिपिक बबन जाधव, बोट क्लब अधीक्षक कल्याण हिवरे, अभियंता मुरलीधर धायगुडे, प्रदीपकुमार बोरगे, सुनील भालेराव, वैभव पांढरे, किरण ढेबे, अरुण बावळेकर तसेच बोट क्लबचे कर्मचारी उपस्थित होते.

वेण्णा नदी आणि वेण्णा तलाव हे महाबळेश्वरच्या जीवनवाहिनीचे प्रतीक मानले जात असल्याने हा सोहळा स्थानिकांसाठी विशेष श्रद्धेचा आणि सांस्कृतिक महत्त्वाचा मानला जातो.

वेण्णा तलाव तुडुंब भरल्यामुळे परिसरातील नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण असून, पर्यटकांनाही हिरवाईने नटलेल्या निसर्गसौंदर्याचा मनमुराद आनंद घेण्याची संधी मिळत आहे.

## सिंदलताई राठोड अनुदानित आदीवासी आश्रमशाळेत विद्यार्थ्यांचा प्रवेशा उत्सव साजरा




**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०६, चंद्रपूर :** (मुल) पंचायत समिती अंतर्गत येत असलेल्या नांदगाव सिंधलताई राठोड अनुदानित आदीवासी आश्रमशाळेत नुकताच विद्यार्थ्यांचा प्रवेशा उत्सव साजरा करण्यात आला. कार्यक्रम दरम्यान नवोदित विद्यार्थ्यांचा स्वागत करुन विद्यार्थ्यांना शिक्षण प्रवाहात आणण्यासाठी संकल्प करण्यात शिक्षणाच्या आवडी निवडी संबंधी मार्गदर्शन करण्यात विद्यार्थ्यांना गोडी निर्माण करण्यासाठी शाळेच्या पाहिल्या दिवसी पाठ्यपुस्तके वितरण करुन गोडधोड देण्यात आले. यावेळी प्रकल्प कार्यालयाचे प्रतिनिधी गृहपाल फरकडे सर हे शाळेला भेट देत कार्यक्रमाची सांगता केली होती. कार्यक्रमाप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक तथा प्राचार्य एस पि बक्षी, माजी उपसरपंच विजय जाधव, प्रतिष्ठीत नागरिक गुरुदास सिडाम शाळेचे सर्व शिक्षक वृंद तसेच कर्मचारी उपस्थित होते.

## डॉ.श्यामा प्रसाद मुखर्जी जयंतीनिमित्त अभिवादन व वृक्षारोपण



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०६, पोंभूर्णा (चंद्रपूर) :** भारतीय जनता पार्टी पोंभूर्णा तालुक्याच्या वतीने भारतीय जनसंघाचे संस्थापक, प्रखर राष्ट्रवादी नेते डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. यानिमित्त पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत वृक्षारोपणाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला.

हा कार्यक्रम राज्याचे माजी मंत्री तथा बल्लारपूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार मा. सुधीरभाऊ मुनगंटीवार यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष हरीश भैय्या शर्मा यांच्या नेतृत्वाखाली आयोजित करण्यात आला. यावेळी उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी डॉ.श्यामा प्रसाद मुखर्जी यांच्या राष्ट्रनिष्ठ विचारांचे स्मरण करून त्यांच्या कार्याचा आदर्श घेण्याचा संकल्प केला. एक देशात दोन विधान, दोन प्रधान आणि दोन निशाण चालणार नाही या त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचा निर्धारही व्यक्त करण्यात आला.

या कार्यक्रमात भाजपा तालुका अध्यक्ष, मंडळ पदाधिकारी, शक्ती केंद्र प्रमुख, बूथ अध्यक्ष, मोर्चा पदाधिकारी तसेच कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी भाजपा पोंभूर्णा तालुक्याचे तालुका अध्यक्ष हरीश ढवस यांच्या नेतृत्वाखाली सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

## पारनेर तालुक्यात तीन दिवसांपासून पावसाची रिपरिप खरीप पिकांना जीवदान



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०६, पारनेर (अहिल्यानगर) :** पारनेर तालुक्यात सलग तिसऱ्या दिवशी सर्वदूर संततधार पाऊस होत असल्याने बळीराजासह नागरिक पशू पक्षी जनावरांच्या चारा पाण्याचा प्रश्न माग लागताना दिसत आहे. या संततधार पावसामुळे खरीप हंगामातील पिकांना जीवदान मिळाले असून शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. जून महिना कोरडा गेला असून जुलै महिन्याचा एक आठवडा उलटूनही अद्याप काही ठिकाणी मोठ्या पावसाने हजेरी लावली नसल्याने पेरण्या खोळंबल्या आहेत.

मे, जुन महिन्यात पारनेर तालुक्यात पावसाने चांगलीच ओढ दिली होती. त्यामुळे पिण्याच्या पाण्यासह शेतीचे गणित बिघडले होते. परंतु जुनच्या शेवटच्या आठवड्यात व जुलैच्या पहिल्याच दिवसापासून पारनेर तालुक्यात कमी जास्त प्रमाणात का होईना पाऊस पडत आहे. शनिवार दि. ४ रविवार व सोमवारी देखील दिवसभर तालुक्यात कमी जास्त प्रमाणात का होईना पण दिवसभर संततधार पाऊस पडला.

पारनेर तालुका कृषी अधिकारी गजानन घुले यांनी सांगितले की, पारनेर तालुक्यात जुन अखेर सरासरी ५७ मिली मिटर पाऊस झाला असुन जुलै महिन्यात तालुक्यात सरासरी १ ते ३ जुलै दरम्यान ५.६ मिलीमिटर पाऊस नोंदवला गेला असल्याचे कृषी अधिकारी घुले यांनी सांगितले. पारनेर तालुक्यात जुन २०२६ अखेर ५३४० हेक्टर क्षेत्रावर खरीपाच्या पेरण्या झाल्या असुन यामध्ये प्रामुख्याने सोयाबीन, मुग, उडीद, तुर, सह चारा पिक मका, कडवळ यांचा समावेश आहे.

शनिवार रविवार व सोमवार सलग तीन दिवस दिवसभर पारनेर तालुक्यात संततधार पाऊस पडला असुन जाणकारांच्या मते या पावसाचे प्रमाण १५ ते २० मिलीमीटर असु शकते. या पावसाने चालु पिकांना मोठा फायदा होणार आहे. अनेक ठिकाणी थांबलेल्या पेरण्या माग लागू शकतात. तसेच लांबलेल्या पावसामुळे अनेक ठिकाणी पिण्याच्या पाण्यासह जनावरांच्या चाऱ्याची मोठी समस्या उभी राहिली होती. मागिल चार सहा दिवसापासून हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडू लागल्याने बळीराजा सुखावला आहे.

## पुण्यातील मुसळधार पावसाचा सोलापूरला मोठा दिलासा

**उजनी धरणाची सद्यस्थिती...**

धरणातील सध्याची आवक : २८,७०० क्युसेस
पाणीपातळी : मायनस २८
पुढील दोन दिवसांत प्लस स्तरावर जाण्याची शक्यता
खरीप हंगामासाठी दिलासादायक परिस्थिती
सोलापूरच्या पिण्याच्या पाणीपुरवठा व सिंचनासाठी मोठा आधार.



**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.०६, पंढरपूर :** पुणे जिल्ह्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे इंद्रायणी नदी दुथडी भरून वाहत असून अनेक भागांमध्ये पूरस्थिती निर्माण झाली आहे. संत ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखी प्रस्थानालाही या अतिवृष्टीचा फटका बसला असून प्रशासनाला विविध ठिकाणी खबरदारीचे उपाययोजना कराव्या लागत आहेत. पुणे शहरासह जिल्ह्यात जनजीवन विस्कळीत झाले असले, तरी या पावसाचा अत्यंत सकारात्मक परिणाम सोलापूर जिल्ह्यावर दिसून येत आहे.

पुणे जिल्ह्यातील धरणक्षेत्रात सुरू असलेल्या दमदार पावसामुळे भीमा नदीच्या प्रवाहात मोठी वाढ झाली असून त्याचा थेट फायदा उजनी धरणाला होत आहे. सध्या उजनी धरणात तब्बल २८ हजार ७०० क्युसेस पाण्याची आवक सुरू असल्याची माहिती समोर आली आहे. गेल्या काही दिवसांपासून अत्यल्प आवक असलेल्या धरणात आता वेगाने पाणी जमा होऊ लागल्याने जलसाठ्यात वाढ होण्याची चिन्हे स्पष्ट दिसत आहेत.

सध्या उजनी धरणाची पाणीपातळी मायनस २८ वर असली तरी, आवक कायम राहिल्यास येत्या दोन दिवसांत धरणाची पातळी प्लस स्तरावर पोहोचण्याची शक्यता जलसंपदा विभागातील सूत्रांनी व्यक्त केली आहे. त्यामुळे धरणाच्या जलसाठ्यात लक्षणीय वाढ होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

उजनी धरणावर सोलापूर जिल्ह्यातील लाखो नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याची तसेच हजारो हेक्टर शेतीच्या सिंचनाची जबाबदारी अवलंबून आहे. यंदा जिल्ह्यात अपेक्षित प्रमाणात पाऊस न झाल्याने शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण होते. मात्र, पुणे जिल्ह्यातील पावसामुळे उजनी धरणात सुरू झालेली वाढती आवक शेतकऱ्यांसाठी आशेचा किरण ठरत आहे.

विशेषतः खरीप हंगामाच्या तोंडावर धरणातील जलसाठा वाढल्यास पेरणीनंतरच्या पिकांना आवश्यक सिंचनाची उपलब्धता वाढणार आहे. तसेच भविष्यातील पाणीटंचाईचा धोका काही प्रमाणात कमी होण्यास मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. त्यामुळे उजनी धरणातील प्रत्येक वाढता क्युसेस सोलापूर जिल्ह्यासाठी दिलासादायक ठरत असून शेतकरी आणि नागरिकांच्या नजरा आता पुढील काही दिवसांतील पावसावर आणि धरणातील आवकेवर खिळल्या आहेत.

## मराठवाड्याच्या रेल्वे विकासासाठी खासदार संजय जाधव यांचा एल्गार



**अक्षराज : रहीम कोक्कर**

**दि.०६, परभणी :** मराठवाड्याच्या रेल्वे विकासाचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आणत शिवसेनेचे खासदार संजय जाधव यांनी दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागाच्या खासदार बैठकीत रेल्वे प्रशासनासमोर मागण्यांचा अक्षरशः पाऊस पाडला.

परभणी रेल्वे स्थानकाचा सर्वांगीण विकास, नवीन रेल्वेगाड्या, प्रवाशांसाठी अत्याधुनिक सुविधा, सुरक्षा व्यवस्था आणि अनेक वर्षांपासून रखडलेले रेल्वे प्रकल्प तातडीने पूर्ण करण्यासाठी त्यांनी ठाम आणि आक्रमक भूमिका घेतली. खासदार जाधव यांनी परभणी रेल्वे स्थानकाच्या पुनर्बांधणीला गती देणे, प्लॅटफॉर्म क्रमांक ४ व ५ चे काम तातडीने पूर्ण करणे, कोच वॉटर फिलिंगची कायमस्वरूपी सुविधा उपलब्ध करून देणे, तसेच परभणी, पूर्णा आणि परळी वैजनाथ येथील रेल्वे बायपासची रखडलेली कामे मार्गी लावण्याची मागणी केली. गंगाखेड, पिंगळी आणि पेडगाव येथील रेल्वे उड्डाणपूल व रेल्वे गेटची प्रलंबित कामेही तातडीने पूर्ण करण्यावर त्यांनी भर दिला.

प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी आरपीएफ व जीआरपी जवानांची संख्या वाढवणे, स्थानकांवरील सीसीटीव्ही व्यवस्था अधिक सक्षम करणे, डिजिटल डिस्प्ले बोर्ड, आधुनिक उद्घोषणा प्रणाली, अत्याधुनिक प्रतीक्षालय आणि पाच रुपयांत शुद्ध आरओ पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणीही त्यांनी केली.

मराठवाड्याला देशाच्या विविध भागांशी अधिक सक्षम रेल्वे जोडणी मिळावी यासाठी नांदेड-पुणे वंदे भारत एक्स्प्रेस, छत्रपती संभाजीनगर-हैदराबाद वंदे भारत एक्स्प्रेस, नांदेड-हरिद्वार, नांदेड-जोधपूर/जैसलमेर, अमृत भारत एक्स्प्रेससह अनेक नवीन रेल्वेगाड्या सुरू करण्याची मागणी त्यांनी केली. गंगाखेड आणि मानवत रोड स्थानकांवर अधिक रेल्वेगाड्यांना थांबा देण्याचाही मुद्दा त्यांनी ठामपणे मांडला.

बैठकीत मराठवाड्याच्या रेल्वे विकासाला प्राधान्य देण्याची आवश्यकता अधोरेखित करत, परभणी लोकसभा मतदारसंघासह संपूर्ण मराठवाड्याच्या रेल्वे विकासासाठी आणि प्रवाशांच्या हितासाठी माझा पाठपुरावा यापुढेही अधिक जोमाने सुरू राहील, अशी ग्वाही खासदार संजय जाधव यांनी दिली.

## मोहर्लीमध्ये विद्यार्थ्यांसाठी शालेय बस सेवा सुरु; वन विभागाच्या पुढाकाराने मोठा दिलासा




**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०६, चंद्रपूर :** वन विभागाने मोहर्ली परिसारातील विद्यार्थ्याचा सुरक्षित आणि नियमित शालेय प्रवास सुनिश्चित करण्यासाठी शालेय बस सेवा सुरु केली आहे. या उपक्रमामुळे विद्यार्थी आणि पालकांना मोठा दिलासा मिळाला आहे. मोहर्ली हे गाव वनक्षेत्राला लागून असल्याने, विद्यार्थ्यांची सुरक्षितता ही दीर्घकाळापासून चिंतेची बाब होती. शालेय बस सेवेच्या शुभारंभामुळे विद्यार्थ्यांना शाळेत ये-जा करताना अधिक सुरक्षितता आणि सोय मिळेल. सध्या, बससेवा सकाळी ६.३० वाजता नियोजित आहे. विद्यार्थ्यांच्या गरजेनुसार भविष्यात अतिरिक्त बस सेवा सुरु करण्याची योजना आहे. या महत्वपूर्ण उपक्रमाबद्दल गावकऱ्यांनी आणि पालकांनी वन विभागाचे सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे कौतुक व आभार व्यक्त केले. गावकऱ्यांच्या मते, ही बस केवळ वाहतुकीचे साधन नसून, परिसरातील विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी उचललेले एक महत्वाचे पाऊल आहे. यावेळी मोहर्ली वनपरिक्षेत्र अधिकारी संतोष थिपे, क्षेत्र सहाय्यक एस. जुमडे, वनरक्षक सुरेंद्र मंगम, आरती अटलवार, मोहर्ली ग्रामपंचायत सरपंच सुनिता काटकर, पोलीस पाटील रामकृष्ण साखरकर, माजी सरपंच संजय मोंडे, माजी उपसरपंच राजू ढवळे यांच्यासह मोहर्ली ग्रामस्थ व मोठ्या संख्येने उपस्थित होते.

